# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः19.02.2025** **वारःबुधवार**

---

- भारत आणि कतार यांच्यात लवकरच मुक्त व्यापार करार; व्यापार ५ वर्षात दुप्पट करुन २८ अब्ज डॉलरपर्यंत नेण्याचा निर्धार
- गुजरातमधल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत भाजपला निर्विवाद यश
- युक्रेनमधील युद्ध संपवण्यासाठी वाटाघाटी करण्यासाठी पथके नियुक्त करण्याचा अमेरिका आणि रशियाचा निर्णय
- छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त, महाराष्ट्रात ‘जय शिवाजी जय भारत’, पदयात्रेचं आयोजन आणि
- नवव्या आयसीसी चॅम्पियन्स चषक क्रिकेट स्पर्धेला आजपासून सुरुवात.

**<u>कतार</u>**

भारताचे कतारशी असलेले संबंध अनेक शतकं जूने असून, कतार, पश्चिम आशियातील भारतासोबतच्या व्यावसायिक आणि सांस्कृतिक संबंधांचा अविभाज्य भाग आहे असं प्रतिपादन राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू यांनी काल केलं. भारताच्या दौऱ्यावर असलेले कतारचे आमीर, शेख तमिम बिन हमद अल थानी यांच्या सन्मानार्थ आयोजित करण्यात आलेल्या विशेष भोजन समारंभात त्या बोलत होत्या.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि कतारचे आमीर शेख तमिम बिन हमद अल थानी यांच्यात काल नवी दिल्लीत चर्चा झाली. चर्चेदरम्यान, भारत आणि कतार यांच्यातला व्यापार येत्या ५ वर्षात दुप्पट करुन २८ अब्ज डॉलरपर्यंत नेण्याचा निर्धार उभय देशाच्या नेत्यांनी व्यक्त केला असून, त्यासाठी लवकरच मुक्त व्यापार करार केला जाणार आहे. या बैठकीदरम्यान, उभय देशांनी धोरणात्मक भागिदारी आणि दुहेरी करनिर्धारण टाळण्यासाठीच्या सामंजस्य करारांवर स्वाक्षरी केली. तसंच आर्थिक भागिदारी वाढवणं, पुराभिलेखांचं व्यवस्थापन, क्रीडा आणि युवक व्यवहार क्षेत्रातले संबंध मजबूत करण्यासाठीही यावेळी करार झाले. व्यापार, ऊर्जा सुरक्षा, गुंतवणूक, तंत्रज्ञान या क्षेत्रातले संबंध आणखी दृढ करण्यावर यावेळी चर्चा झाल्याचं परराष्ट्र मंत्रालयाचे सचिव अरुण कुमार चटर्जी यांनी सांगितलं.

उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी देखील काल कतारचे आमीर शेख तमिम बिन हमद अल थानी यांची भेट घेऊन द्विपक्षीय संबंधांच्या विविध मुद्यांवर चर्चा केली.

भारतीय उद्योग महासंघातर्फे आयोजित भारत-कतार संयुक्त व्यापार मंचांची परिषद काल नवी दिल्लीत पार पडली. भारत आणि कतार दरम्यान सहकार्याला प्रचंड वाव असून ते वृद्धिंगत करण्याचा उभय राष्ट्रांचा निर्धार असल्याचं प्रतिपादन केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनी परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना केलं.

**<u>जम्मूकाश्मीर</u>**

गुन्हेगारी-विरोधी तीन नव्या कायद्यांची येत्या एप्रिल महिन्यापर्यंत प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आदेश केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी जम्मू-काश्मीर प्रशासनाला दिले आहेत. या संदर्भात शहा यांनी, जम्मू काश्मीरचे  नायब राज्यपाल मनोज सिन्हा आणि मुख्यमंत्री ओमार अब्दुल्ला यांच्या बरोबर काल नवी दिल्लीत बैठक  घेतली. पीडितांना लवकरात लवकर न्याय मिळवून देण्यासाठी तंत्रज्ञानाची मदत घ्यावी, असं शहा यांनी सुचवलं आहे.

**<u>गुजरात-निवडणूक</u>**

गुजरातमधल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत भाजपानं निर्विवाद यश मिळवलं आहे. भाजपानं 68 पैकी 60 नगरपालिकांवर विजय मिळवला आहे. समाजवादी पक्षाला 2 जागा मिळाल्या असून कॉंग्रेसला एका जागेवर समाधान मानावं लागलं आहे.   जुनागड महानगरपालिकेत भाजपानं 60 पैकी 48 जागा जिंकल्या आहेत. भाजपानं 16 तारखेला मतदान झालेल्या तीनही ग्रामपंचायतींवरही विजय मिळवला. 213 जागांवर भाजपचे उमेदवार बिनविरोध निवडून आले. या विजयाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजरातच्या जनतेचे आभार मानले आहेत.

**<u>दिल्ली-विधिमंडळबैठक</u>**

दिल्ली भाजप विधिमंडळ पक्षाची आज नवी दिल्लीत बैठक होणार आहे. सर्व नवनिर्वाचित भाजप आमदार आणि पक्षाचे वरिष्ठ नेते या चर्चेत सहभागी होतील. या बैठकीत दिल्लीच्या पुढील मुख्यमंत्र्यांचे नाव निश्चित होण्याची शक्यता असल्याचं सूत्रांनी सांगितलं आहे. नवीन मुख्यमंत्र्यांचा शपथविधी समारंभ उद्या, गुरुवारी, दिल्लीतील रामलीला मैदानावर होण्याची शक्यता आहे. दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपने ७० पैकी ४८ जागा जिंकल्या होत्या.

**<u>मंत्रीमंडळनिर्णय</u>**

सहावा राज्य वित्त आयोग स्थापन करण्यास काल झालेल्या महाराष्ट्र मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. हा आयोग 1  एप्रिल 2 हजार 26 ते 31 मार्च 2 हजार 31 या पाच वर्षांच्या कालावधीसाठी शिफारशी करेल. या शिफारशींबाबत अहवाल सादर करण्यास या आयोगाला 31 डिसेंबर 2हजार 25 पर्यंत मुदत असेल.

राज्यात अंमली पदार्थ विरोधी कृती दल स्थापन करण्यास तसंच त्यासाठी 3शे 46 पदांना आणि त्यासाठीच्या खर्चाला कालच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

**<u>युक्रेनयुद्ध-वाटाघाटी</u>**

अमेरिका आणि रशियाने युक्रेनमधील युद्ध संपवण्याच्या उद्देशाने, वाटाघाटी करण्यासाठी पथके नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. सौदी अरेबियातील रियाध इथं काल झालेल्या उच्चस्तरीय चर्चेदरम्यान युक्रेन युद्ध संपवण्यासाठी संभाव्य शांतता कराराचा मार्ग मोकळा करण्याच्या उद्देशाने उभय देशांमधील पहिली चर्चा झाली. रशियाचे परराष्ट्रमंत्री सर्गेई लावरोव्ह आणि मुख्य परराष्ट्र धोरण सल्लागार युरी उशाकोव्ह, तर, अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार माइक वॉल्ट्झ आणि पश्चिम आशियाचे दूत स्टीव्ह विटकॉफ यांचा शिष्टमंडळात समावेश होता.

**<u>आसाम-राष्ट्रीयजलमार्ग</u>**

आसाम मधील जोगीघोपा इथे, ब्रह्मपुत्रा नदीवर अंतर्गत जलवाहतुकीस उपयुक्त ठरणाऱ्या राष्ट्रीय जलमार्गाच्या दुसऱ्या टप्प्याचं केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आलं. भूतानचे अर्थमंत्री लियोंपो नामग्याल दोरजी या कार्यक्रमाला उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हा टप्पा कार्यान्वित झाल्याबद्दल समाज माध्यमांवरील संदेशातून समाधान आणि आनंद व्यक्त केला आहे. या प्रदेशाच्या प्रगती आणि समृद्धीसाठी अंतर्गत जलमार्गांना प्रोत्साहन देण्यासाठी हे एक महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचं त्यांनी संदेशात म्हंटलं आहे. हे अत्याधुनिक टर्मिनल भूतान आणि बांगलादेशदरम्यानच्या व्यापारासाठी उपयुक्त ठरणार असून, यामुळे आसाम आणि ईशान्येकडील भागात मालवाहतूक वाढण्याची अपेक्षा आहे.

**<u>बिहार-उद्घाटन</u>**

बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या प्रगती यात्रेदरम्यान, काल त्यांनी कैमूर जिल्ह्यात सुमारे ३४५ कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या, १शे ६९ विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी केली. कैमूरमध्ये वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाचं काम लवकरच सुरू होईल असं आश्वासन त्यांनी यावेळी बोलताना केलं. या यात्रेदरम्यानच नितीश कुमार यांनी, एका पदवी महाविद्यालयाचं उद्घाटन केलं, तसंच सोन नदी-कोहिरा नदी जोड प्रकल्पाची पाहणी केली.

**<u>निवडणूकआयुक्त</u>**

मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून ज्ञानेश कुमार आज पदभार स्वीकारणार आहेत. राजीव कुमार यांचा निवडणूक आयोगाच्या प्रमुखपदाचा कार्यकाळ संपल्यामुळे ज्ञानेश कुमार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ज्ञानेश कुमार यांनी यापूर्वी संसदीय कामकाज मंत्रालयात सचिवपदाची जबाबदारी सांभाळली होती.

**<u>बेरोजगारीदर</u>**

गेल्या वर्षीच्या ऑक्टोबर-डिसेंबर तिमाहीत शहरी भागातील १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या लोकांच्या बेरोजगारीच्या दरात ६ पूर्णांक ४ दशांश टक्क्यांची घट झाली आहे. चालू आर्थिक वर्षाच्या डिसेंबर तिमाहीत बेरोजगारीचा दर ६ पूर्णांक ५ दशांश टक्के होता.

**<u>ऑगस्तावेस्टलँडघोटाळा</u>**

ऑगस्ता वेस्टलँड हेलिकॉप्टर घोटाळा प्रकरणातील आरोपी क्रिस्टन मायकेल जेम्स याचा जामीन अर्ज सर्वोच्च न्यायालयानं काल मंजूर केला. या व्यवहारात तो मध्यस्थ म्हणून काम करत असल्याचा त्याच्यावर आरोप त्याच्यावर आहे. या प्रकरणी जेम्स गेली ६ वर्ष कारावासात आहे. या प्रकरणाचा तपास अजूनही चालूच असल्यामुळे, त्याचा जामीन मंजूर करत असल्याचं न्यायालयानं सांगितलं.

**<u>साहित्ययात्रीसंमेलन</u>**

दिल्लीत होणाऱ्या 98व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात सहभागी होणाऱ्या साहित्य रसिकांसाठी पुणे ते दिल्ली महादजी शिंदे एक्सप्रेस विशेष रेल्वे सेवा उपलब्ध करून दिली जाणर आहे. ही विशेष रेल्वे आज दुपारी दोन वाजता पुण्यातून निघेल आणि उद्या रात्री दिल्लीत पोहोचेल. रेल्वे प्रवासादरम्यान फिरत्या चाकांवरचं 'मराठी साहित्ययात्री संमेलन' होणार आहे. रेल्वेमध्ये होणारं हे मराठीतलं पहिलंच संमेलन असेल.

**<u>शिवजयंती</u>**

आज छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आहे. त्यानिमित्ताने पुण्यासह राज्यातल्या सर्व जिल्ह्यात 'जय शिवाजी जय भारत', ही पदयात्रा काढण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून या पदयात्रेचं उद्घाटन करतील. शिवजयंतीचा राज्यातला मुख्य कार्यक्रम पुण्यात होत असून केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्यासह राज्याचे मंत्री आणि 20 हजार 'माय भारत स्वयंसेवक' या पदयात्रेत सहभागी होणार आहेत.

या व्यतिरिक्त, ऐतिहासिक स्थळांची स्वच्छता, व्याख्याने, पदयात्रा, तसंच सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

मुंबई विद्यापीठाच्या परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा बसवण्यास राज्य सरकार पूर्ण पाठिंबा देईल अशी घोषणा महाराष्ट्राचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी काल केली. "शिव शौर्य गाथा" पोवाडा गायन स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते मुंबईत बोलत होते.

**<u>आयसीसीचॅम्पियन्सट्रॉफी</u>**

नवव्या आयसीसी चॅम्पियन्स चषक क्रिकेट स्पर्धेला आज सुरुवात होत आहे. या पहिल्या सामन्यात गतविजेता पाकिस्तान आणि न्यूझीलंड संघ कराची इथे आमने सामने येतील. रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाची उद्या दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर बांगलादेश विरुद्ध लढत होईल.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.